स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ , नांदेडच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत पीएच.डी (अर्थशास्त्र) पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा आराखडा

“मराठवाड्यातील शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास विशेष संदर्भ:नांदेड जिल्हा ”

: संशोधक :

श्री केंद्रे सुभाष शिवाजीराव

(एम.ए , एम.फिल)

: संशोधन मार्गदर्शक :

प्राचार्य डॉ.श्री शिवदास दिगांबर स्वामी

श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान

महाविद्यालय हदगाव

मार्च २०१६

अभ्यास केंद्र

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ , नांदेड

शोध प्रबंधाचा गोषवारा
“मराठवाड्यातील शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास
विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा”

१) प्रस्तावना (Introduction)

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था हि कृषि प्रधान असून राज्यातील एकूण लोकसंख्येपैकी जवळ-जवळ ७०% लोकसंख्या कृषिक्षेत्रावर आधारित आहे.राज्यात कोरडवाहू क्षेत्राचे प्रमाण अधिक असून जलसिंचनाचे प्रमाण १८% इतके आहे. बहुसंख्य जनतेचे शेती हे उदर्निर्हावाचे साधन आहे. राज्यात सिमांत शेतकरी, अल्पभूधारक , भूमिहीन शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.ग्रामीण भागातील औद्योगिकरणाचे प्रमाण कमी आहे महाराष्ट्र राज्यातील लागवडीखालील एकूण क्षेत्र २ कोटी १६ लाख ६२ हजार हेक्टर इतके आहे यापैकी ३३ लाख ३८ हजार हेक्टर ओलिताखाली आहे . तसेच राज्यातील निव्वळ पेरणी क्षत्र १ कोटी ७९ लाख हेक्टर असून त्यापैकी जवळ-जवळ ४७ % म्हणजे ८४ लाख हेक्टर क्षेत्र भूपृष्ठवरील व भूगृभातील पाण्याद्वारे ओलिताखाली आहे त्यामुळे राज्यातील सिंचनाखालील क्षेत्राचे प्रमाण कमी असल्यामुळे शेतीत उपलबद्ध होणारा रोजगार कमी आहे .

मराठवाडा हा राज्यातील महसुली विभाग असून औद्योगिक दृष्ट्या मागास आहे. मराठवाड्यातील लोकांचा प्रमुख व्यवसाय हा शेती असून. मराठवाड्यातील एकूण उत्पानात प्राथमिक , द्वितीय व तृतीय या तीन क्षेत्राचा मराठवाड्याच्या एकूण उत्पणात समावेश होते. मराठवाद्याच्या अर्थव्यवस्थेत या तिन्ही क्षेत्राला महत्व प्राप्त झाले आहे. येथे शेतकरी व शेतमजूर यांचे प्रमाण अधिक आहे. मराठवाड्याचे एकूण क्षेत्रफळ ६४,८१८ चौ. किमी असून मराठवाड्याची लोकसंख्या १५६ लाख इतकी आहे.मराठवाड्यातील कृषिक्षेत्र ६४.४४ लाख हेक्टर इतके आहे , तर एकूण पिक लागवडीखालील क्षेत्र ६७.३० हेक्टर आहे व अन्नधान्य पिकाखालील क्षेत्र ३६.८७ हजार हेक्टर असून शेतकऱ्यांची एकूण संख्या २१.८० हजार आहे तर शेतमजुरांची संख्या १९.२२ हजार इतकी आहे म्हणून शेतमजुरांची आर्थिक समस्या निर्माण झाली आहे. मराठवाडा विभागातील सामान्य जनतेचे आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी कृषिव्यवसाय सुधारणे आवश्यक आहे यात उत्पन , उत्पादन , रोजगार, आर्थिक विकास , औद्योगिक विकास , जनतेच्या राहणीमानाच्या दर्जा सुधारणे अतिशय महत्वाचे आहे. यात कृषिक्षेत्राची भूमिका महत्वाची आहे . याकरिता मराठवाड्यातील कृषिक्षेत्राचा विकास होणे अतंत्य महत्वाचे आहे तसेच कृषि अर्थव्यवस्थेचे रुपांतर औद्योगिक अर्थव्यवस्थेत आणि कृषिचे निर्वाहपर स्वरूप बदलून तिला व्यापारी स्वरूप येण्यासाठी कृषि विकास करणे आवश्यक आहे .

नांदेड जिल्ह्यातील एकूण मजुरांपैकी शेतमजुरांचे प्रमाण जास्त आहे प्रस्तुत शोधनिबंधात नांदेड जिल्ह्यातील कृषि शेतमजुराचे उत्पन व त्यांचे आर्थिक व सामाजिक स्थिती व राहणीमनाचा दर्जा इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

२) समस्या सूत्रण (Threading Problems)

सदरील संशोधनात मराठवाड्यातील शेतमजुरांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यात विविध योजना व कार्यक्रमाची अंमलबजावणी केली आहे तसेच यात राष्ट्रीय रोजगार हमी योजना , जवाहर रोजगार योजना, ग्रामीण विकास कार्यक्रम ,कृषिक्षेत्रातील सामाजिक सुरक्षा योजना व सुर्वण जंयती ग्राम स्वयं रोजगार योजना इत्यादी योजनांचा फायदा घेऊन मजुरी दरात वाढ होण्यासाठी विविध आयोगाची नेमणूक करून वेळोवेळी सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आहे . यामुळे मजुरांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारणाने अपेक्षित आहे.

मराठवाड्यातील शेतमजुरांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारली आहे का ? नांदेड जिल्ह्यातील शेतमजुरांचे राहणीमान उंचावले आहे का ? नांदेड जिल्ह्यातील शेतमजूर शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेतात का ? नांदेड जिल्ह्यातील शेतमजुरांची संख्या कमी-अधिक झाली आहे का? शेतमजुरांचे उत्पन वाढले आहे का? एकूण शेतमजुरात महिलापेक्षा पुरुष शेतमजुरांचे प्रमाण वाढले आहे का? या प्रश्नचा अभ्यास कारणे हा या अध्ययनाचा प्रमुख हेतू आहे.

३) संशोधनाची उद्धेश (Objective of the study)

१) मराठवाड्यातील शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास कारणे.
२) नांदेड जिल्ह्यातील शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास कारणे.
३) नांदेड जिल्ह्यातील शेतमजुरांच्या राहणीमानाचा अभ्यास कारणे.
४) नांदेड जिल्ह्यातील शेतमजुरांच्या प्रवृतीतील बदलाचा अभ्यास कारणे.

४) संशोधनाची गृहितके (Hypothesis of the study)

प्रस्तुत अभ्यासात पुढील गृहितकांची तपासणी करावयाची आहे.

१) मराठवाड्यातील शेतमजुरांच्या संख्येत वाढ झाली आहे.
२) नांदेड जिल्ह्यातील शेतमजुरांच्या संख्येत घट झाली आहे.
३) नांदेड जिल्ह्यातील शेतमजुरांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारली आहे.
४) नांदेड जिल्ह्यातील शेतमजुर विविध शासकीय योजनेचा लाभ घेतात.
५) नांदेड जिल्ह्यातील महिला मजुरापेक्षा पुरुष मजुरांचे प्रमाण अधिक आहे.

५)अभ्यासाची पद्धती (Research methodology)

प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहे.

प्राथमिक साधन सामग्री

प्रस्तुत संशोधनात प्रश्नावली या तंत्राचा उपयोग करण्यात आलेला असून त्याची नमुना निवड पद्धतीने शेतमजुरांचे निवड करून त्यांच्याकडून मुलाखतीद्वारे माहिती संग्रहित करून निष्कर्ष काढण्यात येणार आहे.

दुय्यम साधन सामग्री

नांदेड जिल्ह्यातील शेतमजुरांच्या आर्थिक व समाजिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी राज्य पातळी वरील, विभागीय व जिल्हा पातळीवरील आवश्यक ती माहिती प्रकाशित झालेल्या माहितीतून घेण्यात आली आहे.आवश्यक ती स्वरुपाची माहिती प्राप्त करण्यासाठी जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, भारतीय जनगणनेत वेळोवेळी प्रसिद्ध केलेली माहिती , राष्ट्रीय नमुना पाहणी समितीचे अहवाल, महाराष्ट्र राज्याचा सांख्यिकीय गोषवारा , मानव विकास अहवाल, महाराष्ट्र शासनाचे विविध मासिके, यांचा मुख्य स्रोत म्हणून उपयोग करण्यात आला आहे.

सांख्यिकीय साधनात सारणीयाण, प्रतिशत प्रमाण , प्रमापविचालन , निर्देशांक , संयुक्त वृद्धी दर, श्रेणी सहसंबंध गुणक या सर्व साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

६) संशोधनाची मर्यादा (Limitations of the study)

सदरील संशोधनाची मर्यादा खालील प्रमाणे आहे.

१) प्रतुत शोधनिबधाची मर्यादा हि मराठवाड्या पुरतीच मर्यादित असून त्या मध्ये विशेष संदर्भ नांदेड जिल्ह्यातील शेत मजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यासापुरता शोधनिबंध मर्यादित आहे.

२) सदरील शोधनिबंध करण्यासाठी निवडण्यात आलेला कालखंड हा ई.सन २००१ ते २०१२ हा राहील.

७)प्रकरणाची रचना (Structures of chapters)

१) प्रस्तावना

२) अभ्यासाची पद्धत, उद्धेश , संकल्पना , मर्यादा व पूर्व संशोधन साहित्याच आढावा.

३) नांदेड जिल्ह्याची तोंड ओळख.

४) नांदेड जिल्ह्यातील शेतमजूरांच्या आर्थिक वसामाजिक समस्या.

५) नांदेड जिल्ह्यातील शेतमजुरांच्या समस्या व उपाययोजना.

६) प्रमुख निष्कर्ष व शिफारसी.

: संशोदक :

प्रा.केंद्रे सुभास शिवाजीराव
(एम.ए , एम.फिल)

: संशोदक मार्गदर्शक :

प्राचार्य डॉ.श्री शिवदास दिगांबर स्वामी
श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हदगाव

संदर्भ सूची

१) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००२-२००३, २०१०-११,नांदेड जिल्हा

२) मानव विकास अहवाल, महाराष्ट्र :२००२-०३

३) https://www.maharashtra.gov.in/Site/Upload/CM%20News/English/2014/May/30-05-2014%20Manav%20Vikas%20Ahwal%20VimochanCM%20News.pdf

४) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००४-२००५, २०१०-११,नांदेड जिल्हा http://www.censusindia.gov.in/2011census/dchb/2715_PART_B_DCHB_%20NANDED.pdf

५) डॉ. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (संपादक),मराठी ज्ञानकोशातून येथे जा. Vol.१५ महाराष्ट्रातील साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ , मुंबई-३२

६) मानव विकास अहवाल, महाराष्ट्र : २००८-०९

७) महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेची रचना – एक अभ्यास पिएच डी शोधप्रबंध